DISCOVER
NASHIK KUMBH

# नाशिक-त्र्यंबकेश्वर
# सिंहस्थ-२०२७

भारताच्या सर्वात मोठ्या आध्यात्मिक पर्वाला

**तुमच्या कल्पनांची जोड द्या!**



# सिंहस्थ कुंभ

## जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक महासंगम

कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक मेळावा आहे, जो भारतातील चार पवित्र स्थळांवर दर 12 वर्षांनी आयोजित केला जातो. हा श्रद्धा, भक्ती आणि प्राचीन परंपरांचा एक संगम आहे, जो जगभरातील लाखो लोकांना प्रेरणा देत आहे.



## कुंभमेळ्याचे महत्त्व

### दैवी उगम

समुद्रमंथनाच्या वेळी अमृताचे थेंब पृथ्वीवरील चार पवित्र स्थळी पडल्याची पौराणिक श्रद्धा आहे. त्याच स्मरणार्थ कुंभमेळा आयोजित केला जातो.

### पवित्र अनुभूती

कुंभमेळ्यादरम्यान पवित्र नद्यांमध्ये स्नान केल्याने पापे नष्ट होतात आणि मोक्ष प्राप्त होतो, अशी श्रद्धा आहे.

### एकतेचे प्रतीक

धर्म, भाषा, संस्कृती आणि देशांच्या सीमा ओलांडून लाखो लोकश्रद्धेच्या भावनेने येथे एकत्र येतात.

### प्राचीन परंपरा

हजारो वर्षांची धार्मिक परंपरा, पुराणांतील उल्लेख आणि सनातन संस्कृतीचा अमूल्य वारसा जपणारा हा महोत्सव आहे.

### जागतिक आकर्षण

कुंभमेळा भारताच्या सांस्कृतिक वैभवाचे प्रतीक असून जगभरातील भाविक व पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे.

## भारतातील चार पवित्र कुंभक्षेत्रे

### प्रयागराज

गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमाचे पवित्र तीर्थक्षेत्र.



### हरिद्वार

गंगा नदीच्या पवित्र तीरावर वसलेले भारतातील प्रमुख धार्मिक केंद्र.



### उज्जैन

पवित्र क्षिप्रा नदीच्या तीरावर वसलेले ऐतिहासिक आणि आध्यात्मिक शहर.



### नाशिक

पवित्र गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले सिंहस्थ कुंभाचे प्रमुख तीर्थक्षेत्र.



**सन २०२७ मध्ये नाशिक सिंहस्थ कुंभासाठी सज्ज होत आहे.**

- जगातील सर्वात मोठा शांततापूर्ण धार्मिक मेळावा
- कोट्यवधी भाविकांचा सहभाग
- दर 12 वर्षांनी आयोजित होणारा महासोहळा
- श्रद्धा, संस्कृती आणि परंपरेचा अद्वितीय संगम
- छायाचित्रकार आणि कंटेंट निर्मात्यांसाठी स्वर्ग

> " कुंभ हा केवळ धार्मिक उत्सव नाही; तो श्रद्धा, अध्यात्म, मानवता आणि सनातन संस्कृतीचा जागतिक उत्सव आहे."

# नाशिक-त्र्यंबकेश्वर
# सिंहस्थ कुंभ
# २०२७



## श्रद्धा, परंपरा आणि
## अध्यात्माचा दिव्य संगम

नाशिक हे सिंहस्थ कुंभाचे पवित्र व ऐतिहासिक तीर्थक्षेत्र आहे. गुरु, सूर्य आणि चंद्र यांच्या विशिष्ट ग्रहयोगानुसार येथे कुंभमेळा भरतो. पवित्र गोदावरी, त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंग आणि रामकुंडामुळे नाशिकला सनातन परंपरेत विशेष महत्त्व प्राप्त आहे.

येथे वाहणारी पवित्र गोदावरी नदी हजारो वर्षांपासून ऋषी, संत,साधू आणि कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेची साक्षीदार आहे. या पवित्र नदीत स्नान करणे अत्यंत पुण्यकारक मानले जाते.

## नाशिकच का?

### शिवपावन भूमी
त्र्यंबकेश्वर ज्योतिर्लिंगाचे स्थान असून भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक पवित्र ज्योतिर्लिंग येथे आहे.

### गोदावरी नदी
दक्षिणेची गंगा म्हणून ओळखली जाणारी गोदावरी नदी श्रद्धा, शुद्धीकरण आणि मोक्षाचे प्रतीक मानली जाते.

### धार्मिक वारसा
मंदिरे, संतपरंपरा, पुराणकालीन इतिहास आणि आध्यात्मिक वारसा लाभलेले भारतातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र.

### कोट्यवधी भाविक
प्रत्येक सिंहस्थ कुंभामध्ये देश-विदेशातून लाखो भाविक, साधू-संत आणि पर्यटक नाशिकला भेट देतात.

### आध्यात्मिक स्पर्श
दर बारा वर्षांनी मिळणारी पवित्र स्नानाची आणि सनातन संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची दुर्मीळ संधी.

## नाशिक सिंहस्थ कुंभ- प्रमुख कालावधी

- **३१ ऑक्टोबर २०२६** – अधिकृत प्रारंभ
- **२४ जुलै २०२७** – ध्वजारोहण समारंभ
- **२ ऑगस्ट २०२७** – प्रथम अमृत स्नान (आषाढ सोमवती अमावस्या)
- **३१ ऑगस्ट २०२७** – द्वितीय अमृत स्नान (श्रावण अमावस्या)
- **५ सप्टेंबर २०२७** – ऋषी पंचमी
- **११ सप्टेंबर २०२७** – तृतीय अमृत स्नान (वैष्णव) – रामकुंड, नाशिक
- **१२ सप्टेंबर २०२७** – तृतीय अमृत स्नान (शैव) – कुशावर्त तीर्थ, त्र्यंबकेश्वर
- **१५ सप्टेंबर २०२७** – भाद्रपद पौर्णिमा
- **११ ऑक्टोबर २०२७** – आश्विन शुद्ध एकादशी
- **१५ ऑक्टोबर २०२७** – आश्विन पौर्णिमा
- **१० नोव्हेंबर २०२७** – कार्तिक शुद्ध एकादशी
- **१४ नोव्हेंबर २०२७** – कार्तिक पौर्णिमा
- **२६ जानेवारी २०२८** – मौनी अमावस्या
- **१ फेब्रुवारी २०२८** – वसंत पंचमी
- **८ फेब्रुवारी २०२८** – गंगा-गोदावरी महोत्सव
- **२७ फेब्रुवारी २०२८** – महाशिवरात्री
- **२५ मे - २ जून २०२८** – गंगा दसरा उत्सव
- **२४ जुलै २०२८** – अधिकृत समारोप (ध्वज अवतरण समारंभ)



## डिस्कव्हर
# नाशिक कुंभ

डिस्कव्हर नाशिक कुंभ 2027 हा देशव्यापी सर्जनशील उपक्रम असून छायाचित्रकार, चित्रपट निर्माते, कलाकार, डिझायनर्स, लेखक, विद्यार्थी, व्यावसायिक आणि कंटेंट क्रिएटर्स यांना नाशिक व सिंहस्थ कुंभ 2027 चा आध्यात्मिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि पर्यटन वारसा आपल्या सर्जनशीलतेद्वारे दस्तऐवजीकरण, जतन आणि जगभर पोहोचविण्याची संधी देतो.

---

या उपक्रमाद्वारे नाशिकची ओळख जागतिक स्तरावर डिजिटल स्वरूपात जतन करणे, भारतातील समृद्ध सांस्कृतिक वारशाचा प्रचार करणे आणि नवोदित तसेच अनुभवी सर्जनशील व्यक्तींना राष्ट्रीय व्यासपीठावर आपली प्रतिभा सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा प्रमुख उद्देश आहे.

> "श्रद्धा, परंपरा, सर्जनशीलता आणि भारताच्या शाश्वत सांस्कृतिक वारशाचा हा एक भव्य उत्सव आहे."

## तुम्ही सहभागी का व्हावे?

### तुमची कला सादर करा
राष्ट्रीय व जागतिक स्तरावर कला, सर्जनशीलता आणि कौशल्य सादर करण्याची सुवर्णसंधी.

### राष्ट्रीय स्तरावर ओळख
आकर्षक पारितोषिके, अधिकृत प्रमाणपत्रे आणि तज्ज्ञांकडून विशेष सन्मान मिळविण्याची संधी.

### करिअर संधी
तुमच्या कामाला व्यावसायिक ओळख मिळवून देत भविष्यातील संधींसाठी मजबूत पोर्टफोलिओ तयार करा.

### नाशिक कुंभाचा प्रसार
भारताच्या आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचा प्रचार करणाऱ्या राष्ट्रीय मोहिमेचा भाग बना.

### नेटवर्क विस्तार
उद्योगातील तज्ज्ञ, मार्गदर्शक,कलाकार आणि इतर सर्जनशील व्यक्तींशी संवाद साधून मजबूत नेटवर्क तयार करा.

### अधिक प्रसिद्धी मिळवा
अधिकृत माध्यमांतून तुमच्या उत्कृष्ट कलाकृतींना व्यापक प्रसिद्धी मिळवा.

### इतिहासाचा भाग बना
तुमची कलाकृती नाशिक सिंहस्थ कुंभ 2027 च्या अधिकृत डिजिटल संग्रहाचा भाग बनू शकते.

### सकारात्मक परिवर्तन घडवा
तुमच्या सर्जनशीलतेतून लाखो लोकांना प्रेरणा देत सांस्कृतिक वारसा जपा.

## ऐतिहासिक प्रवासाचा भाग बना!

पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी असा सांस्कृतिक वारसा निर्माण करूया.

# स्पर्धा व प्रकार

**तुमच्या सर्जनशीलतेतून साकारूया**
**नाशिक कुंभ २०२७**

नाशिक कुंभ 2027 हा केवळ धार्मिक उत्सव नसून श्रद्धा, संस्कृती, इतिहास आणि मानवतेचा जागतिक उत्सव आहे. या स्पर्धांद्वारे प्रत्येक सर्जनशील व्यक्तीला आपल्या कलागुणांद्वारे नाशिक आणि सिंहस्थ कुंभाची ओळख जगभर पोहोचविण्याची सुवर्णसंधी मिळणार आहे.

## स्पर्धांचे प्रकार

तुमची कला निवडा • तुमची दृष्टी मांडाः • नाशिक कुंभ साजरा करा

1. डिस्कव्हर नाशिक फोटोग्राफी स्पर्धा
2. डिस्कव्हर नाशिक रील स्पर्धा
3. नाशिक शॉर्ट फिल्म स्पर्धा
4. हिडन जेम्स ऑफ नाशिक
5. नाशिक एक्सप्लेनर व्हिडिओ स्पर्धा
6. त्र्यंबकेश्वर फोटोग्राफी स्पर्धा
7. रामकुंड फोटोग्राफी स्पर्धा
8. त्र्यंबकेश्वर रील चॅलेंज
9. रामकुंड रील चॅलेंज
10. कुंभ फोटो स्पर्धा
11. कुंभ रील स्पर्धा
12. कुंभ शॉर्ट फिल्म स्पर्धा
13. कुंभ थ्रू माय लेन्स
14. कुंभ एक्सप्लेनर व्हिडिओ स्पर्धा
15. कुंभ इन्व्हिटेशन रील स्पर्धा
16. मी कुंभात का येत आहे? व्हिडिओ स्पर्धा
17. माझा कुंभ अनुभव व्हिडिओ स्पर्धा
18. डिस्कव्हर नाशिक पेंटिंग स्पर्धा
19. कुंभ पेंटिंग स्पर्धा
20. कुंभ डिजिटल आर्ट स्पर्धा
21. वेलकम टू नाशिक कुंभ आर्टवर्क स्पर्धा
22. नाशिक स्टोरी / निबंध स्पर्धा
23. डिस्कव्हर नाशिक ब्लॉग रायटिंग चॅलेंज
24. कुंभ निबंध स्पर्धा
25. कुंभ ब्लॉग रायटिंग चॅलेंज
26. माझी कुंभ स्टोरी
27. माझा कुंभ संकल्प

# स्पर्धेचे वेळापत्रक
# व महत्त्वाच्या तारखा

नाशिक कुंभ 2027 स्पर्धा महोत्सवाचे सर्व महत्त्वाचे टप्पे जाणून घ्या; यामध्ये नोंदणी, प्रवेशिका सादर करणे, मूल्यमापन आणि निकाल जाहीर करणे यांचा समावेश आहे.

**२० सप्टेंबर २०२६**

### स्पर्धेचा अधिकृत शुभारंभ

नाशिक कुंभ 2027 स्पर्धेची अधिकृत घोषणा करण्यात येईल आणि देशभरातील सर्जनशील व्यक्तींना सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले जाईल.

**०१ ऑक्टोबर २०२६**

### नोंदणी सुरू

देशभरातील विद्यार्थी, कलाकार, छायाचित्रकार, कंटेंट क्रिएटर्स आणि सर्व इच्छुक सहभागी नोंदणी करून आपल्या सर्जनशील प्रवासाची सुरुवात करू शकतील.

**३० नोव्हेंबर २०२६**

### प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख

स्पर्धेतील सर्व विभागांसाठी छायाचित्रे, व्हिडिओ, रील्स, शॉर्ट फिल्म, ब्लॉग, निबंध, चित्रकला आणि इतर प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख.

**१५-२० डिसेंबर २०२६**

### तज्ज्ञांकडून मूल्यांकन

प्राप्त झालेल्या सर्व प्रवेशिकांचे सर्जनशीलता, मौलिकता, विषयाशी सुसंगतता, सादरीकरण आणि एकूण प्रभाव यांच्या आधारे तज्ज्ञ परीक्षकांकडून मूल्यांकन केले जाईल.

**२५-३० डिसेंबर २०२६**

### निकाल जाहीर

प्रत्येक स्पर्धा विभागातील उत्कृष्ट प्रवेशिकांची निवड करून अधिकृत निकाल जाहीर करण्यात येईल.

**५-१५ जानेवारी २०२७**

### पारितोषिक वितरण समारंभ

विजेते आणि उल्लेखनीय सहभागींना आकर्षक पारितोषिके, सन्मानचिन्हे आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

# सहभागी वयोगट

प्रत्येक वयोगटासाठी समान संधी आणि विशेष गौरव

### प्राथमिक गट

लहान मुलांच्या कल्पनाशक्ती, रंगसंगती आणि सर्जनशीलतेतून नाशिक व सिंहस्थ कुंभाची ओळख मांडण्याची सुवर्णसंधी.

### माध्यमिक गट

विद्यार्थ्यांना नाशिक आणि सिंहस्थ कुंभाविषयीचे विचार, कल्पना आणि सर्जनशीलता प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी व्यासपीठ.

### महाविद्यालयीन गट

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आधुनिक विचार, संशोधन, नवकल्पना आणि कलात्मक अभिव्यक्तीद्वारे सहभाग नोंदविण्याची संधी.

### खुला गट

वयाची कोणतीही मर्यादा नाही. कलाकार, व्यावसायिक, कंटेंट क्रिएटर्स, छायाचित्रकार, लेखक आणि सर्व इच्छुकांसाठी खुला गट.

### ज्येष्ठ नागरिक गट

अनुभव, परंपरा, संस्कार आणि जीवनमूल्यांमधून सिंहस्थ कुंभाचा समृद्ध वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी विशेष गट.

# प्रत्येक गटासाठी आकर्षक पारितोषिके

सर्व स्पर्धा व सहभागी गटांसाठी

### प्रथम पारितोषिक

उत्कृष्ट सर्जनशीलता व प्रभावी सादरीकरणासाठी प्रथम पारितोषिक प्रदान केले जाईल.

### द्वितीय पारितोषिक

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सहभागीला द्वितीय पारितोषिकासह आकर्षक भेटवस्तू आणि सन्मान प्रदान करण्यात येईल.

### तृतीय पारितोषिक

उल्लेखनीय सर्जनशीलता, उत्कृष्ट प्रयत्न आणि प्रभावी मांडणी करणाऱ्या सहभागीला तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

### उत्तेजनार्थ पुरस्कार

वैशिष्ट्यपूर्ण कल्पना व उल्लेखनीय सहभागासाठी उत्तेजनार्थ पुरस्कार प्रदान केले जातील.

DISCOVER
NASHIK KUMBH

# आमच्याशी संपर्क साधा

सहभाग, स्पर्धेसंबंधी माहिती, तांत्रिक सहाय्य किंवा नाशिक कुंभ 2027 विषयी कोणतीही माहिती हवी असल्यास आमच्याशी संपर्क साधा. आमची टीम आपल्या प्रत्येक प्रश्नासाठी सदैव मदतीसाठी तत्पर आहे.

### ई-मेल

joinnashikkumbh@gmail.com
connect@discovernashikkumbh.in

### दूरध्वनी क्रमांक

+९१ ८२६३९५६३८५
+९१ ९५१८३५३५१२

### व्हॉट्सॲप

+९१ ८२६३९५६३८५
+९१ ९५१८३५३५१२

### आमचे ऑफिस

**शिवालय**
फाळके स्मारक जवळ, पांडवलेणी,
नाशिक, महाराष्ट्र.

### संकेतस्थळ

discovernashikkumbh.in

### अधिकृत सोशल मीडिया

@DiscoverNashikKumbh
Twitter - @JoinNashikKumbh



**तुमच्या यशस्वी सहभागासाठी**
**आम्ही सदैव तत्पर!**

सहभाग नोंदणीपासून स्पर्धेच्या निकालापर्यंत प्रत्येक टप्प्यावर आमची टीम तुमच्या सोबत असेल.

**नाशिक कुंभ २०२७ च्या अविस्मरणीय प्रवासाचा अभिमानाने भाग बना.**

आजच सहभागी व्हा आणि या ऐतिहासिक उपक्रमाचा भाग बना.